नि.दि.दावा क्र. २५०/२०२३
पंडीत वि. दगडू व इतर
CNR No-MHLA130003352024

**निशाणी क्र. २७ खालील आदेशः–**

प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी क्रं १ व २ यांनी जबाब दावा दाखल करण्यास १७२ दिवसाचा झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यावर वादीने प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्रं १ व २ यांच्या विद्वान विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादींना महत्वाची कागदपत्र न मिळाल्यामुळे व प्रतिवादी यांच्या दवाखान्याच्या कारणाने ते त्यांचा जबाब दावा मुदतीत दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे जबाब दावा दाखल करण्यास १७२ दिवसाचा विलंब झालेला आहे. तरी सदरचा विलंब माफ करण्यात यावा, अशी विनंती केली.

३. वादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्रं १ व २ यांनी खोटे कारण या अर्जामध्ये नमुद केले आहे. प्रतिवादी हे जाणुन बुजुन प्रकरण चालविण्यास विलब करीत आहे. त्यांना पुरेसा वेळ मिळाला होता तरीही त्यांनी मुदतीत त्यांचे म्हणणे सादर केले नाही. म्हणून सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजूंचे म्हणणे पाहिले. वादी यांनी प्रस्तुत दावा हा प्रतिवादी यांच्या विरुध्द वाटणी होऊन स्वतंत्र ताबा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी क्रं १ व २ यांचे महत्वाचे हक्क व हितसंबध गुंतलेले आहेत. तसेच प्रतिवादी क्रं १ व २ यांनाही बचावावाची संधी देणे हे न्याय गरजेचे आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित होईल. सबब खालीलप्रमाणे आदेश,

**आदेश**

**१.** प्रतिवादी क्रं १ व २ यांचा नि.क्रं.२७ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या जबाब दावा दाखल करण्यास १७२ दिवसाचा झालेला विलंब प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या वर रुपये ४००/– दंड बसवुन माफ करण्यात येतो.

**३.** प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दंड रक्कम वादी यांना द्यावी.

स्वाक्षरीत/–

(के.के.वाघमारे)

सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर., रेणापूर

रेणापूर

दिनांकः– १६/०१/२०२५.